# जाहीर लिलाव सूचना

म.प्रा.प्र वणी रंभापूर येथील तलावाचे मासेमारी हक्क देण्यासाठी माहे जुन २०२२ ते मार्च २०२४ या कलावधिकारिता मासेमारी हक्क देण्यासाठी दिनांक २४/०६/२०२२ रोजी सकाळी ठीक ११.०० वाजता पुनचः जाहीर लिलाव करण्यात येईल तरी इछुक व्यक्तींनी लीलावस हजार राहावे लिलावात बोली बोलणाऱ्या इछुक व्यक्तींनी अग्रिम रक्कम रु १५०००/- भरावी लागेल लिलावाच्या अटी व शर्ती म.प्रा.प्र वणी रंभापूर कार्यालयात कामकाजाच्या वेळी पाहावयास मिळतील

23/6/22

मुख्य बिजोत्पादन अधिकारी
मध्यवर्ती प्रात्यक्षिक प्रक्षेत्र
वणी रंभापूर

**जाहीर लिलावाच्या अटी व शर्ती खालील प्रमाणे**

१. जाहीर लिलाव ठरलेल्या ठिकाणी, तारखेस व वेळेवर होईल.

२. लिलावात बोली बोलण्यास रु १५०००/- अग्रिम रक्कम जमा करावी लागेल अन्यथा बोली बोलता येणार नाही.

३. अग्रिम रक्कम रु १५०००/- ज्यांनी तलाव घेतला असेल त्यांच्या लीलावच्या रकमेत वळती करण्यात येईल व इतरांची रक्कम त्याच ठिकाणी परत करण्यात येईल.

४. लीलावाची बोली संपताच लीलावाची संपूर्ण रक्कम त्याच वेळी भरावी लागेल अन्यथा अग्रिम रक्कम जप्त करण्यात येईल.

५. वरील अटीचे उल्लंघण झाल्यास समिति एकतर्फी निर्णय घेऊन लीलावातून मूक्त होईल.

६. दिनांक ३१/०३/२०२४ पर्यंतच मासेमारीचा हक्क राहील त्यानंतर कोणताही हक्क राहणार नाही.

७. तलावास योग्य किमत न मिळाल्यास लिलाव रद्द करण्याचा किंवा पुढे ढकलण्याचा अधिकार समितीस राहील.

८. सदर तलाव सपूर्णतः नैसर्गिक पाण्यावर अवलंबून आहे जाहिर लिलावाच्या दिवशी या तलावात जेवढे पाणी जमा झाले आहे त्या शिवाय विद्यापीठा तर्फे पाण्याची पातळी वाढविणे करिता कोणत्याही प्रकारचा पाणी पुरवठा करण्यात येणार नाही याचे नोंद घ्यावी.

९. तलावाचे संपूर्ण संरक्षण तलाव घेतल्यास स्वता करावे लागेल व आसं पासच्या अवगमनास अडथळा होणार नाही ही दक्षता घ्यावी लागेल.

१०. तलावातून गेलेल्या विद्युत तारा व विद्युत खांब या बाबत योग्य ती दक्षता घेण्यात यावीलिलाव झालेल्या तलावाचा कालावधी जून २०२२ ते मार्च २०२४ पर्यंत राहील त्या दरम्यानच्या कालावधीत २४ तास चौकीदार ठेवणे अनिवार्य राहील अन्यथा करार संपुष्टात येईल. तसेच या दरम्यान कोणत्याही प्रकारची दुर्घटना झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी लिलाव घेणाऱ्याची राहील. त्यास या कार्यलयाचे विभागाचेअधिकारी/कर्मचारी प्रक्षेत्र जबाबदार राहणार नाही

११. विभागावरील प्रक्षेत्रा करिता वेळोवेळी पाण्याचा वापर पिकाकरीता केल्या जाणार आहे त्यामुळे पाण्याची पातळी कमी झाल्यास त्याबद्दल तक्रार करता येणार नाही.

१२. तलावातील मासेमारी संदर्भातील योग्य उपाय योजना, लिलाव घेणाऱ्याची राहील त्यासंदर्भात विभगाची जबाबदारी राहणार नाही.

मुख्य बिजोत्पादन अधिकारी
मध्यवर्ती प्रात्यक्षिक प्रक्षेत्र
वणी रंभापूर